# त्रिवेणी संगम



तीन नद्यांचा पवित्र संगम
मना मोहवी अतीव अनुपम

प्रखर रवीचे तेजस पाते
कल्पकतेला देत चालना
दिसते आणि जे नच दिसते
त्यांचे येथे जुळवी नाते

वसुंधरेच्या सर्वांगावर
पर्जन्याचे पडता पाणी
चैतन्याला जीवन मिळता
खळखळती निर्झरांत गाणी

ऊनपावसातून पसरते
इंद्रधनुची कमान कलती
साप्तकातली रंगत येथे
सौंदय संगमी कवने रचती

सूर्य पाहता अस्त स्वतःचा
पंचभूतांची होई मिसळण
चंद्रबिंब संगमी तरलता
अमृतात ह्या होई स्पंदन

चितारलेले चित्र मनी हे
नीरी संगमी भिजुनी राहे
द्वैतामध्ये . . . अद्वैताची
प्रचिती ह्या पाण्यातून वाहे . . .

*विजय पाठारे*